# सौर ऊर्जा जनजागृती अभियान अहवाल
# डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर
# ( दिनांक २१ व २२ जून २०२५ )

**AISHE CODE: C -18864**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने "करिअर कट्टा" या उपक्रमांतर्गत सोलर सोसायटी ऑफ इंडिया आणि विवा कॉलेज विरार यांच्या सहकार्याने ५५५५५ तरुणांना सोलर ऊर्जा बाबत प्रशिक्षण उपक्रमाचा जाणीव जागृत उपक्रम शुभारंभ १० जुन रोजी मा. श्री. चंद्रकांत दादा पाटील (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र शासन) यांच्या जन्मदिनी पर्वावर ऑनलाइन पद्धतीने मा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर (संचालक, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन) आणि प्रा. प्रफुल्ल फाटक (सेक्रेटरी, सोलर सोसायटी ऑफ इंडिया) यांच्या उपस्थित पार पडला.

या शुभारंभानंतर "Solar Energy Awareness Training Program २०२५ प्रशिक्षण अभियान " या जाणीव जागृती उपक्रमाची माहिती महाराष्ट्रातील सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध माध्यमांचा वापर करण्यात आला आणि उपक्रमाची माहिती महाविद्यालयातर्फे इतर महाविद्यालयांना व विद्यार्थ्यांना व्हावी म्हणून महाविद्यालयाने काही विविध कार्यक्रम आयोजित केले. हे खालील प्रमाणे :

## १) उपक्रमासाठी पूर्वनियोजन

सौर ऊर्जा जनजागृती अभियानाबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी दि. १७ जुन २०२५ रोजी सर्व करिअर संसदेतील पदाधिकारी यांची बैठक घेऊन त्यांना अभियानाविषयी संपूर्ण माहिती देऊन सदर माहिती सर्व विद्यार्थी व कर्मचारी यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या.या वेळी प्राचार्य डॉ. दीपा पान्हेकर,करिअर कट्टा समन्वयक व करिअर संसदेचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

https://drive.google.com/file/d/1G4IHuMKBuOPgdA6w5Y3WcdFlPMbBymiR/view?usp=drive_link

## २) नोंदणीकरता तयार करण्यात आलेला गुगल फॉर्म

महाविद्यालयाने नवीन प्रवेशित विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची माहिती जमा करण्यासाठी फॉर्म तयार करून सर्वांची माहिती फॉर्मच्या माध्यमातून जमा करून घेतली.

https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSeq5CoO2cAE6zeFdK7eE92oCup8a0c2XljPvuXdFSkBbQWxhQ/viewform?usp=header

## ३) नोंदणी सहभाग

| अ.क्र. | नोंदणी वर्ग | सहभागी संख्या |
|---|---|---|
| १ | प्राचार्य वर्ग | ०१ |
| २ | प्राध्यापक वर्ग | ९४ |
| ३ | शिक्षकेत्तर कर्मचारी | ५७ |
| ४ | विद्यार्थी | १९६० |
| | एकूण = | **२११२** |

## ४) वर्तमानपत्र बातमी

वर्तमानपत्र बातमीच्या माध्यमातून जनजागृती अभियानाबाबत माहिती पोहोचवण्यास खूप मदत झाली.



लोकमत

# करिअर कट्टा उपक्रमांतर्गत सौर ऊर्जा जनजागृती अभियान

**५५,५५५ तरुणांना प्रशिक्षण व प्रमाणपत्र देण्यात येणार**

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरगाव :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'करिअर कट्टा' या उपक्रमांतर्गत सोलर सोसायटी ऑफ इंडिया आणि विरार येथील विवा कॉलेज यांच्या सहकार्याने महाविद्यालयामध्ये सौर ऊर्जा जनजागृती अभियान २०२५ हा उपक्रम राबविण्यात येणार आहे

सौर ऊर्जा जनजागृती अभियान २०२५ हा उपक्रम २१ व २२ जून या कालावधीत महाविद्यालयामध्ये राबविण्यात येणार असून, या उपक्रमांतर्गत ५५,५५५ तरुणांना प्रशिक्षण व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

ज्या महाविद्यालयांमधील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी असे १०० टक्के या अभियानामध्ये सहभाग नोंदवतील, अशा महाविद्यालयांना १०० टक्के सौर उर्जा पुरस्कारप्राप्त कॅम्पस हे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच, सर्व सहभागी विद्यार्थी व महाविद्यालयांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. प्रशिक्षणात ३० मिनिटांचे ऑनलाइन व्याख्यान देण्यात येणार असून, त्यावर परीक्षा होणार आहे. विद्यार्थी निवड ही परीक्षेमधील गुणांकनानुसार केली जाणार आहे. जिल्हास्तरीय प्रथम तीन विजेत्या विद्यार्थ्यांना, तसेच प्रथम व द्वितीय आलेल्या महाविद्यालयांना प्रमाणपत्र व आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात येणार आहे.

विभागीय पातळीवर दोन महाविद्यालयांची, तर राज्यस्तरीयसाठी पाच महाविद्यालयांची निवड केली जाणार आहे. प्रशिक्षण अभियानात सहभागी होण्यासाठी महाविद्यालयांसाठी २० जून रोजी सांयकाळी ५ वाजेपर्यंत, तर विद्यार्थ्यांसाठी २१ जून रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत महाविद्यालयामार्फत नोंदणी करता येणार आहे. प्रशिक्षण व प्रमाणपत्र वितरण २१ जून रोजी सकाळी ८ वाजल्यापासून ते २२ जून सायंकाळी ५ वाजेपर्यंत होणार आहे.

सौर ऊर्जा जनजागृती अभियानांत जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी होण्यासाठी शिरगाव येथील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना याबाबत १६ आणि १७ जून रोजी माहिती देण्यात आली. देवगड तालुक्यातील पुंडलिक अंबाजी कर्ले कला वाणिज्य महाविद्यालय या सौर ऊर्जा जनजागृती अभियानात सहभागी होणार आहे. अधिक माहितीसाठी महाविद्यालयांशी संपर्क साधावा, असे आवाहन करिअर कट्टाच्या वतीने करण्यात आले आहे.

Hello Sindhudurg
Page No. 2 Jun 18, 2025
Powered by: erelego.com

## ५) उपक्रमाची जनजागृती करण्याकरिता करिअर संसदेच्या विद्यार्थ्यांनी बनवलेले व्हिडिओ

https://drive.google.com/file/d/1LuiNMB5l1WNOlu_h5yO1EvcaLZ28vGys/view?usp=drive_link


https://drive.google.com/file/d/1einKAaLWb6H22SfYxvjvx1E8mlYigZKX/view?usp=drive_link

## ६) उपक्रमाची जनजागृती करण्याकरिता करिअर संसदेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेले पोस्टर्स









७) दि. २१ जुन रोजी यूट्यूब च्या माध्यमातून जनजागृती अभियानाविषयी दाखवण्यात आलेला व्हिडिओ




८) उपक्रमात सहभागी करून घेण्यासाठी व करिअर कट्टा ॲप डाउनलोड व सहभागी होण्यासाठी करिअर संसदेतील विद्यार्थ्यांनी केलेले प्रयत्न




# १०) सहभागी प्रमाणपत्र













--------------------------------------------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

| | | |
|---|---|---|
| करिअर संसद प्रतिनिधी | करिअर कट्टा समन्वयक<br>डॉ. विद्या चौरपगार व प्रा. विठ्ठल बोंदर | प्राचार्या<br>डॉ. दीपा पान्हेकर |